वाचले :-

१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/प्र.क्र.१२६/सेवा-४ दि.३१/१०/२००५
२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दि.२७/०८/२०१४
३) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.रानिओ-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दि.३१/०३/२०२३
४) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.रानिप्र-२०२३/प्र.क्र.५७/सेवा-४ दि.२४/०८/२०२३
५) मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३७८३ दिनांक ३०/७/२०२४
६) मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ६५९ दिनांक ६/८/२०२४
७) मा. आयुक्त यांचे कडील दिनांक ९/७/२०२४ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी , लेखा विभाग
क्र. लेखा/१९/कावि/२६९ /२०२४
दिनांक – ०८/१०/२०२४

विषय :- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान मंजूर करणेबाबत

आदेश,

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-यांना कुटुंब निवृत्तीवेतन व सेवाउपदान मंजूर करण्याकामी शासनाकडून शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक ३१ मार्च २०२३ पारीत झालेला आहे. उक्त शासन निर्णयानुसार दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागू असलेल्या कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील तरतूदीअन्वये खालीलप्रमाणे निवृत्तीवेतन विषयक लाभ मंजूर करण्यात आले आहेत.

१. सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान
२. रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवा उपदान लागू करण्यात आलेले आहे.
३. तसेच शासन सेवेतून निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान लागू करण्यात येत आहेत.

उपरोक्त वाचले क्रमांक २ चे शासन निर्णयानुसर प्रकरणी सविस्तर कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय पालिका कर्मचा-यांना लागू करणेकामी मा.स्थायी समिती व मा. महापालिका सभा ठराव वाचले क्रमांक ५ व ६ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या आदेशान्वये प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देत आहे.

१. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत असलेल्या कर्मचा-याच्या मृत्यू पश्चात त्याचे कुटुंबाने सदर शासन निर्णयासोबतच्या नमूना ३ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन नियम १९८२) प्रमाणे कुटुंब निवृत्तीवेतनचा लाभ मिळणेबाबतच्या विकल्पाची निवड केली असल्यास त्या अनुषंगाने कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान अनुज्ञेय करण्यासाठी परिशिष्ठ -१ प्रमाणे कार्यवाही करावी.

२. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत रुग्णता निवृत्त झालेला कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ अंतर्गत रुग्णता निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र ठरत असल्यास व सदर कर्मचा-याने रुग्णता निवृत्तीवेतन अनुज्ञेय करणे या विकल्पाची (नमुना २ नूसार) निवड केली असल्यास परिशिष्ठ -२ प्रमाणे कार्यवाही करावी.

३.परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत सेवेत असलेल्या कर्मचा-याने सोबतच्या नमुना २ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्तीवेतन) नियम १९८२ प्रमाणे रुग्णता निवृत्तीवेतन/ कुटुंब निवृत्तीवेतनाचा लाभ मिळण्याबाबतच्या विकल्पाची निवड केली असल्यास त्याअनुषंगाने रुग्णता निवृत्तीवेतन/ कुटुंब निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्तीउपदान / मृत्यू उपदान अनुज्ञेय करण्यासाठी परिशिष्ठ -३ प्रमाणे कार्यवाही करावी.

४. कर्मचा-याने तो हयात असताना दिलेला विकल्प त्याच्या मृत्युपश्चात त्याच्या कुटुंबियांना कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

५. महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्तीवेतन)१९८२ मधील नियम १३२ मध्ये नमूद केल्यानुसार शासनाला येणे असलेल्या रकमा प्रथमत: सेवानिवृत्ती उपदान/मृत्यू उपदान यामधून वसूल करण्यात येतील.

६. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक ३१/३/२०२३ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतूदीस अनुसरुन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचे मृत्यूपश्चात त्याचे कुटुंबाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ अंतर्गत कुटुंब निवृत्तीवेतन अनुज्ञेय करणे या विकल्पाची (नमुना ३ नुसार) निवड केली असल्यास सदर विकल्पास वित्त विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक रानिप्र-२०२३/प्र.क्र. ५७/सेवा-४ दिनांक २४/८/२०२३ चे परिशिष्ट १ तसेच परिशिष्ट २ मध्ये कार्यपध्दती नमूद करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रति - सर्व संबंधित विभाग
सदर आदेशासोबत उपरोक्त नमूद परिशिष्ठ १ व २ जोडणेत येत आहेत.

प्रत- १. सामान्य प्रशासन विभाग
२. मुख्यलेखापरिक्षण विभाग

e-mail sent on 8-10-2024. to all dept.